क्र.२/नसवि/महासभा/ ०३ /२०१०-२०११
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ११ जून २०१०

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## महानगरपालिका सभा क्रमांक - ०३ /२०१०-२०११

## महानगरपालिका सभेची नोटीस

प्रति,
मा. ----------
सदस्य/सदस्या,
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महानगरपालिका सभेचे कामकाज मधील खंड १ (ए) (एच) (आय) मध्ये केलेल्या तरतुदी नुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **शनिवार दिनांक १९/०६/२०१० रोजी सकाळी ११.३० वाजता पद्मभूषण डॉ.वसंतरावदादा पाटील सभागृह मुख्यालय,सांगली** येथे आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस आपण उपस्थित रहावे अशी विनंती आहे.

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

## परिशिष्ठ

१. मागील म्हणजे सर्वसाधारण सभा दिनांक २०/०५/२०१० च्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

२. सन्माननीय सदस्यांकडून दाखल होणारे -
अ) दु:खवठ्याचे ठराव.
ब) अभिनंदनाचे ठराव.

३. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४४ नुसार सन्माननीय सदस्यांकडून आलेल्या प्रश्नांची उत्तरे.

४. महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालय,मिरज येथील मिरज बेडग रोडवरील कंपोस्ट खताचा र.रु.२,१६,०००/- इतकी देकार रक्कम निश्चित करुन, जाहिर लिलावाने विक्री करणेस महासभेची मान्यता मिळणेकामी स्थायी समिती ठराव क्र.७८ दि.१८/०५/२०१० अन्वये झालेली शिफारस अवलोकनी घेवून निर्णय घेणे.

५. महाराष्ट्र शासनाने औद्योगिक विकासाला चालना मिळणेच्या तसेच त्यामध्ये वाढ होणेच्या दृष्टीकोनातून शासनाने दि.२०/०१/२०१० रोजी प्रसिद्ध केलेल्या सूचनेनुसार औद्योगिक विभागातील औद्योगिक वसाहतीस १.०० चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणेसाठी सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये समावेश करणेकामी महाराष्ट्र नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (ए.ए.) अन्वये मान्यता मिळणेकामी मा.उपसंचालक नगररचना पूणे विभाग पूणे यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस धोरणात्मक मान्यता मिळणेस ~~अमायुक्त~~ (नगररचना विभाग) यांचे दि.०९/०६/२०१० चे विषयपत्र.

६. शासकीय पत्रव्यवहार अवलोकनी घेणे.

७. मा.महापौर, यांचे संमत्तीने दाखल होणाऱ्या ऐनवेळच्या विषयांना मान्यता देणे.

मा.महापौर, यांचे मान्यतेने वितरीत

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०३** दिनांक :- १९/०६/२०१०

ठराव क्रमांक :- ४३

विषय क्रमांक :- ०४

---

सोबतचे उपायुक्त (आरोग्य विभाग) यांचे विषयपत्र व त्यावरील स्थायी समिती ठराव क्र.७८ दि.१८/०५/२०१० अन्वये झालेली शिफारस या सभेने अवलोकनी घेतली.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालय मिरज येथील मिरज-बेडग रोडवर महापालिका मालकीचा कंपोस्ट डेपो आहे. सदर डेपो मध्ये मिरज आणि कुपवाड विभागातील दैनंदिन गोळा होणारा कचरा टाकला जातो. सदर ठिकाणी एकूण २७ खड्डे असून, सदर खड्ड्यातील खतांचा तत्कालीन नगरपालिका अस्तित्वात असलेपासून जाहिर लिलावाने विक्री केली जात होती. कचऱ्यामध्ये प्लॅस्टिक,माती मिश्रीत कचरा असल्याने, खताचा म्हणावा तसा उठाव होत नाही. त्यामुळे खताचा साठा मोठ्या प्रमाणावर साठलेला आहे. सदर डेपोमध्ये कचरा गाड्या जाण्यासाठी पूर्ण रस्ते बंद झालेने, कचरा रस्त्यावरच टाकावा लागत आहे. दरम्यानचे काळात कंपोस्ट डेपोस आग लागल्याने, ४०% खत जळून गेले आहे. उर्वरित खताची जाहिर लिलावाने विक्री केलेस महापालिकेचा आर्थिक फायदा होणार आहे. सबब, महानगरपालिकेच्या मिरज कंपोस्ट डेपोवरील खताची र.रु.२,१६,०००/- मात्र देकार रक्कम निश्चित करुन,जाहिर लिलावाने विक्री करणेस विषयपत्रातील तसेच, स्थायी समिती ठराव क्र.७८ दि.१८/०५/२०१० अन्वये झालेली शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :-

ठराव सर्वानुमते मंजुर

महापौर,

अनुमोदक :-

आरोग्याधिकारी(मिरज)

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०३** दिनांक :- १९/०६/२०१०

ठराव क्रमांक :- ४४

विषय क्रमांक :- ०५

---

सोबतचे उपायुक्त (सहा.संचालक नगररचना विभाग) यांचे दि.०९/०६/२०१० चे विषयपत्र या सभेने अवलोकनी घेतले.

मा.उपसंचालक, नगररचना पूणे, विभाग पूणे यांनी मा.शासनाच्या नगरविकास विभागाकडील दि.२०/०१/२०१० क्र.टिपीएस-२०१०/२५/सीआर/२०९७/२०१०/ नवि-१३ ची नोटीस दिनांक ०४/०३/२०१० रोजीच्या महाराष्ट्र शासन राज्यपत्रात प्रसिद्ध करुन, त्याची प्रत या कार्यालयाकडे सादर केली आहे.

महाराष्ट्र शासनाने औद्योगिक व सोई-सुविधा मधील गुंतवणूकी संबंधीचे धोरण निश्चित केले असून, सदर धोरणाचा मुख्य उद्देश औद्योगिक व सोई-सुविधा क्षेत्रातील खाजगी व सार्वजनिक गुंतवणूकीमध्ये वाढ होवून रोजगार निर्मिती व्हावी तसेच प्रादेशिक समतोल आणि आर्थिक प्रगती व्हावी यामध्ये औद्योगिक सहकारी वसाहती स्थापन करणे. सदर वसाहतींना अर्थसहाय्य उपलब्ध करुन देणे. याबरोबरच सदर वसाहर्तीना चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणेबाबतची योजना राबविणेत येत आहे. त्यानुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या बांधकाम व विकास नियंत्रण नियमावली मध्ये औद्योगिक वापराच्या विकासासाठी ०.५० चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय आहे.

महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार महापालिका क्षेत्रातील औद्योगिक विकासाला चालना मिळणेच्या उद्देशाने आणि त्यामध्ये वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून शासनाच्या निर्देशानुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियमावली मध्ये औद्योगिक विभागातील औद्योगिक वसाहतीस १.०० चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय करणेसाठी महापालिकेच्या विकास नियंत्रण नियमावली मध्ये समाविष्ठ करणेकामी मा.उपसंचालक नगररचना, पूणे विभाग, पूणे यांचेकडे प्रस्ताव सादर करणेस महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) (अे अें) अन्वये विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा धोरणात्मक मान्यता देत आहे.

सूचक :- मा. नंदकुमार देवमुख ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- मा. आनंदा देवमाने

सहा. संचालक नगररचनाकार

महापौर,

महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.

# सांगली,मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

**महासभा क्रमांक :- ०३** दिनांक :- १९/०६/२०१०

ठराव क्रमांक :- ४५

विषय क्रमांक :- ऐन.

---

सोबतचे उपायुक्त (नगररचना विभाग) यांचे दि.१६/०६/२०१० चे विषयपत्र मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण दोन महासभेचे कामकाज मधील खंड १(के) अन्वये ऐनवेळच्या विषयात दाखल करुन घेवून ही सभा खालील प्रमाणे निर्णय घेत आहे.

एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत महानगरपालिकेच्या सांगली येथील स.क्र.२६६ पैकी बालहनुमान कॉलनी क्र.०१ व स.क्र.२६४ पैकी बालहनुमान कॉलनी क्र.०२ या जागेवर सदनिका बांधणेकामी प्रस्तावित बांधकाम नकाशांना मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव नगररचना विभाग, सांगली यांचेकडे सादर केला असता, प्रस्तावाच्या छाननीअंती स.क्र.२६६ ही जागा सांगली मंजूर विकास योजनेनुसार १५.२५ मीटर या रस्ता रुंदीने बाधित होत असून, उर्वरित क्षेत्र आरक्षण क्र.१२७ "डिस्पेन्सरी आणि मॅटर्निटी होम" या आरक्षणाने बाधित असून, सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या क्षेत्राचा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम २६(१) अन्वये प्रसिद्ध केलेल्या आणि कलम ३०(१) अन्वये शासनास मंजूरीसाठी सादर केलेल्या प्रारुप विकास योजनेनुसार प्रस्तुतची जागा १५.२५ मी. रस्ता रुंदीकरणाने बाधित होत असून, उर्वरित क्षेत्रापैकीचे भागशः क्षेत्र सार्वजनिक व निमसार्वजनिक वापर यासाठी निर्देशित करणेत आले असून, उर्वरित क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ठ आहे.

स.क्र.२६४ पैकी जागेवर सांगली शहराच्या मंजूर सुधारीत विकास योजनेनुसार आरक्षण क्र.१२९ "म्युनसिपल शॉप" या आरक्षणाने बाधित होत असून, महापालिकेच्या प्रारुप विकास योजनेनुसार सदरची जागा रहिवास विभागात समाविष्ठ आहे. सदर दोन्ही जागांची छाननी केली असता, बाधकाम मंजुरीसाठी सादर केलेल्या नकाशात प्रस्तावित केलेली सामासिक अंतरे प्रचलित बांधकाम व विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार आवश्यकत्या अंतरापेक्षा कमी आहेत. मा.शासनाच्या नगरविकास विभागाकडील आदेश क्र.टी.पी.एस.११०७/अनौ-३६/प्र.क्र.१३५/०८ नवि-९ दि.२६/०४/२०१० मध्ये सदरची योजना घोषित झोपडपट्टीने बाधित जागेवर राबवावयाची असल्यास प्रस्तावात येणाऱ्या सर्व आरक्षणाबाबत महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा व पुर्नविकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ झेड - ५ (२) नुसार नियोजन मा.संचालक, नगररचना यांच्या पूर्व मान्यतेने विकास योजना / प्रादेशिक योजना महानगरपालिकेच्या मान्यतेने विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदी शिथिल करु शकतील असे निर्देश आहेत.

आदेशातील तरतुदीनुसार वरील दोन्ही प्रस्तावामध्ये आरक्षण व सामासिक अंतराची सवलत मिळणेबाबतच्या प्रस्तावास मा.संचालक, महाराष्ट्र राज्य, पूणे यांनी विषयांकीत प्रस्तावांना सर्वसाधारण महासभेची मान्यता मिळणेच्या अटीवर दि.०८/०६/२०१० चे पत्राने सवलतीस मान्यता दिली आहे. त्याशी ही सभा सहमती दर्शवित असून, महानगरपालिकेच्या सांगली येथील स.नं.२६६ व २६४ बाल हनुमान कॉलनी क्र.०१ व ०२ या जागेवर एकात्मिक गृहनिर्माण झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदी शिथिल करणेकामी मा.संचालक, नगररचना महाराष्ट्र राज्य, पूणे यांचेकडे मान्यतेसाठी सादर केलेल्या प्रस्तावास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा धोरणात्मक मान्यता देत आहे.

एकात्मिक व गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमांतर्गत महापालिकेच्या अन्य ठिकाणच्या जागेवर अशा योजना राबविल्या जाणार असतील तर, अशा ठिकाणच्या जागा आरक्षणाने बाधित होत असतील तर, अथवा सामासिक अंतराबाबत अडचणी उद्भविल्यास अशा जागेवरील आरक्षणे अथवा सामासिक अंतरे शिथिल करणेबाबतची आवश्यकती कार्यवाही प्रशासनाने आपले स्तरावर करणेत यावी त्यास ही सभा मान्यता देत आहे.

सूचक :- मा. आनंदा देवमाने

ठराव सर्वानुमते मंजुर

अनुमोदक :- MKS मा. मनगू सरगर

महापौर,

नगररचनाकार

प्र. महापालिका सचिव,
सांगली मिरज कुपवाड महानगरपालिका.